Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue 20 Vol. I
## on
# भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
# Indian Society & Ideology of Disability

**October 2019**

**Associate Editor**
Dr. Shivaji Wadchkar

**Guest Editor**
Principal Dr. V.D. Satpute

**Assistant Editor**
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

October 2019 Special Issue- 20 Vol. I

# भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
# Indian Society & Ideology of Disability

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Associate Editor
Dr. S.A. Wadchkar

Guest Editor
Dr. Vasant Satpute

Assistant Editor
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I
Octomber 2019

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# Index

| | | |
|---|---|---|
| 1. | अपंगत्व (दिव्यांग) : प्रतिबंधात्मक उपाय, उपचार आणि पुनर्वसनाचे साधने<br>प्रा. डॉ. विलास घोडे | १ |
| 2. | अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणात प्रशासनाची भूमिका<br>प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | १८ |
| 3. | अपंगत्वः स्वरूप,प्रकार व यशस्वी व्यक्ती<br>प्रा. सखाराम बाबाराव कदम | 23 |
| 4. | मराठीतील अपंग साहित्य प्रवाह : अभिसरण आणि मूल्यभान<br>प्रा.अरविंद रा.जाधव | 26 |
| 5. | दिव्यांग व्यक्तीचे प्रकार : एक अभ्यास<br>प्रा. नवनाथ बंकट बडे, | 32 |
| 6. | विकलांग व्यक्तिंचे मराठी कादंबरीतून आलेले चित्रण<br>प्रा. देशमुख बिभीषण | 36 |
| 7. | अपंग व्यक्तींचे प्रकार आणि अपंगत्वाचे व्यवस्थापन<br>प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब | ४२ |
| 8. | दिव्यांगाचे पुनर्वसन एक सामाजिक आव्हान<br>प्रा. गंगाधर चव्हाण | ४६ |
| 9. | मानसिक विकलांगता<br>डॉ. घोडके अरविंद अंबादास | ४९ |
| 10. | दिव्यांग स्त्रियांची समाजिक स्थिती<br>प्रा.ज्ञानेश्वर किसान म्हात्रे | 51 |
| 11. | भारतीय समाजातील अपंगाची स्थिती<br>डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे | 57 |
| 12. | दिव्यांगासाठी शासनाच्या योजना<br>प्रा. डॉ. एम.डी.कच्छवे | ६१ |
| 13. | दिव्यांगासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना<br>प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार | 65 |
| 14. | यशस्वी अपंगत्व<br>प्रा. डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे | 70 |

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue XX, Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

**अभ्यास पद्धती :** सदर शोध निंबधासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील अग्रलेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करून निश्चित केलेल्या उद्देशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**दिव्यांग :** निसर्गाने ज्यांच्या आयुष्यात काहीतरी उणिव ठेवलीच अशा विलकांगांचं आयुष्य म्हणजे कायमच झगडणे असते. त्यांना आधाराशिवाय आपले दैनंदिन व्यवहार पार पाडता येत नाहीत. ते स्वावलंबनाने आपल्या पायावर उभे राहतात. धडधाकट व्यक्तींना अचंबित करणारी कामगिरी करून दाखवतात. त्यांना जगण्याची कसरत करताना अनेक अडथळे पार पाडावे दाखवतात. त्यांची काळजी घेणे हे सुदृढ समाजाची जबाबदारी असते. अस्थिव्यंग असलेल्या मुलांना प्रवास करताना कोणाची तरी मदत होण्याशिवाय गत्यंतर नसतं. घराबाहेर पडणं हेच त्रासदायक असते. त्यामुळे समाजापासून आपोआप अशी मुलं दुरावली जातात. ३० टक्के किंवा ४० टक्के व्यंग असणारी विकलांग बस किंवा ट्रेनने प्रवास करून शकतात. परंतु ५० टक्क्याहून अधिक व्यंग असणारी मुलं आधाराशिवाय प्रवास करू शकत नाहीत. मोठ्या वस्तीत राहणाऱ्या विकलांग मुलांना सार्वजनिक शौचलयाचा वापर करावा लागतो. त्यांच्यासाठी ही खूप अवघड गोष्ट असते. त्यांच्यासाठी त्या परिसरात स्वतंत्र शौचालयाची सुविधा त्यांच्या संख्येनुसार करण्यात यावी.

**दिव्यांगासाठी शासनाच्या विविध योजना :** समाजातील दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोगमुक्त अपंग व्यक्तीकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्याच्यामधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करून त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय तसेच तइर विविध विभागामार्फत कल्याणकारी योजना राबविण्यात येतातृ सामाजिक सुरक्षिततेसाठी अपंगाना कांही क्षेत्रात आरक्षण, सवलती, सूट व प्राधान्य देण्यात आलेले आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी खालील योजना आहेत.

**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ :** राज्यातील विकलांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे. समाजातील दुर्बल, दुर्लक्षीत अपंगाच्या जीवनातील अंध:कार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने दि. ३ डिसेंबर, २००१ रोजी जागतिक अपंग दिनाचा मुहूर्त साधून 'महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. १९५६ च्या प्रमंडळ कायद्यानुसार या महामंडळाची स्थापना दि. २७ मार्च, २००२ रोजी स्थापना करण्यात आली. अपंगाच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा अंगीकृत उपक्रम असणारे हे महामंडळ ही एक स्वायत्त संस्था असून महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ५०० कोटी रुपये आहे. अपंगाना पारदर्शक व तत्पर सेवा देता यावी म्हणून महामंडळाचे आय.एस.ओ. ९००१-२००८ हे आंतरराष्ट्रीय प्रमाणिकरण करण्यात आलेले आहे. राज्यातील बेरोजगार अपंग बांधवाना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे अपंगाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना राबविणे ही महामंडळाची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



**आरोग्य :** अपंगत्व मुळातच येऊ नये म्हणून अपंग प्रतिबंधात्मक, अपंग व्यक्तीचे सर्वेक्षण, शालेय आरोग्य तपासणी, जनजागृती, माता बालसंगोपण कार्यक्रम, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य इत्यादी कार्यक्रम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतात.

**अपंग विद्यार्थ्यांना विशेष शाळामार्फत शिक्षण :** अपंग विद्यार्थी अतितीव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेत येऊ शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांगासाठी शिक्षणाची सोय केली जात आहे. या शाळा निवासी व अनिवासी स्वरूपाच्या असून निवास व भोजनाची विनामुल्य सोय असते.

**शालांत परीक्षा पूर्व शिक्षणसाठी अपंग विद्यार्थ्यांना विष्यवृत्ती :** सामान्य व अपंगाच्या विशेष अनिवासी शाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची इयत्ता पहिली ते चौथी दरमहा ५०/- रुपये, पाचवी ते सातवी ७५/- रुपये आणि नववी-दहावी दरमहा १००/- रुपये तसेच मतिमंदच्या विद्यार्थ्यांना दरमहा ७५/- रुपये दराने शिष्यवृत्ती देण्यात येते.

**व्यवसाय प्रशिक्षण देणे :** १८ ते ४५ या वयोगटातील प्रौढ अपंग व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगाच्या कार्यशाळेमधून रोजगार व स्वयंरोजगाराचे वेगवेगळ्या व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण निवासी व अनिवासी देण्यात येते. राज्यात चार शासकीय कार्यशाळा आणि एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व ७८ स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या कार्यशाळा आहेत.

**रोजगार व स्वयंरोजगार :** अपंग व्यक्तींना सरळ सेवेमध्ये भरतीसाठी ३ टक्के आरक्षण देण्यात आहे. शासकीय व शासन अधिपत्याखाली कार्यालयात गट 'अ' ते गट 'ड' पदावर सरळ सेवाभरती मध्ये अंध १ टक्का, कर्णबधीर १ टक्का आणि अस्थिव्यंग १ टक्के असे एकूण ३ टक्के आरक्षण व सरळ सेवेने भरल्यास प्रत्येक पदासाठी १०० बिंदू नामावलीमधील क्रमांक १, ३४ आणि ६७ अपंगासाठी राखीव आहेत. ४५ वर्षापर्यंत जास्तीत जास्त वयोमर्यादा शिथिल करण्यात आली आहे.

**अपंग व्यक्तीसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन :** शासकीय धोरणानुसार ३ टक्के आरक्षणाचा लाभ अपंगाना शासकीय नोकरीत मिळवून देण्याचा प्रयत्न असतो; परंतु खाजगी क्षेत्रात अपंगांना नोकरीच्या संधी तितक्या सहजतेने उपलब्ध होताना दिसत नाही. त्यांनाही या क्षेत्रात भरपूर संधी मिळवून देवून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन केले जाते.

**अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल देणे :** १८ ते ५० वयोगटतील दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांग अपंग व्यक्तींना स्वयरोगाराही रु. १,५०,०००/- च्या व्यवसायासाठी ८० टक्के बँकेमार्फत कर्ज व २० टक्के कमाल रूपये ३०,०००/- अनुदान स्वरूपात दिले जाते.

**अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे :** शारीरिक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग व्यक्तीसाठी कॅलिपर्स कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्र व अंध व्यक्तींना चष्मे, काठ्या तसेच इयत्ता दहावी नंतरचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व दहा कोऱ्या कॅसेटचे संच दिले जातात.

**अपंग व्यक्तींना एस.टी. प्रवास भाड्यात सवलत देणे :** अपंग व्यक्तींना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे एस.टी.प्रवास भाड्यामध्ये अपंग व्यक्तीस ७५ टक्के व त्याच्या सोबत्यास ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. यासाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त झालेले असावे. तसेच ते ४० टक्केहून अधिक अपंगत्व असावे.

**निष्कर्ष :** शाळा-महाविद्यालयालयात अपंगासाठी अनेक सेवा सुविधांची आवश्यकता असते. त्या उपलब्ध करून देण्याची मानसिकताही कांही ठिकाणी आढळते परंतु बहुतेक ठिकाणी विकलांगासाठी सेवा सुविधा फार तुटपुंज्या असतात. शाळा-महाविद्यालयाच्या इमारती उंचच उंच आहेत. तळमजल्यावर वर्ग (तासिका) घेण्याचे सौजन्य महाविद्यालयांनी दाखविला पाहिजे. त्याच्या अपंगत्वाचा विचार करून त्याप्रमाणे त्यांच्यासाठी वेगवेगळ्या प्रयोगशाळा, लहान ग्रंथालयाची सोय करायला हवी त्यांच्या शारीरिक गरजांबरोबर मानसिक गरजेचाही विचार करायला हवा. लोकल रेल्वेत अंपगासाठी खास डबा असतो. प्लॅटफॉर्मच्या उंचीमुळे त्या डब्यात प्रवेश करतांना त्यांना त्रास होत नाही. विकलांगासाठी शासनाकडून अनेक योजना आहेत. या योजनांचा त्यांना कांही उपयोग होतो की नाही हे पाहणे महत्वाचे आहे. विकलांगासाठी असलेल्या सवलतीचा फायदा दुसरेच लोक घेताना दिसतात. खोटी प्रमाणपत्र काढून विकलांगाच्या सवलती लुटतात रेल्वे, एसटीमध्ये अपंगाच्या सिटवर दुसरीच माणसे बसलेली दिसतात. विकलांगांना आपल्या देशात कमी लेखन जात. त्यांना समाजात मैत्रीपूर्ण असं वातावरण समाजात असण्याची गरज आहे. ९५ टक्के रेल्वे स्थानकावर रॅम्प व लिफ्टची व्यवस्था नाही. सरकारी कार्यालयातही प्रवेश करण्यासाठी रॅम्पची व्यवस्था नाही. त्यामुळे अडचणी येतात. अपंगासाठी अगोदर सोयी-सुविधा कमी असतात आणि राखीव असलेल्या जागेवर इतर लोकच आपला अधिकार गाजवून बसतात.

**संदर्भसूची :**

१. जोसेफ तुस्कानो : आंतरराष्ट्रीय अपंग दिन दैनिक महाराष्ट्र टाइम्स दि. ०३ डिसेंबर २०१०
२. डॉ. त्र्यंबक दुनबळे : जन माध्यम प्रसारण अधिकारी मुंबई.
३. मा. संपादक : विकलांगांना हव्यात हक्काच्या सोयी दै. प्रहार, दि. ६ एप्रिल २०१४
४. सुरेश वांदिले : अपंगासाठी प्रशिक्षण संधी दै. लोकसत्ता दि. २० एप्रिल २०१६

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani